Any persons who acquires share(s) and become a Member of the Company after the cut-off date, should treat this notice for information purpose only.

In case of any queries, you may refer the Frequently Asked Questions (FAQs) for Shareholders and e-voting user manual for Shareholders available at the download section of www.evoting.nsdl.com or call on: 022-4886 7000 and 022-2499 7000 or send a request to Ms. Pallavi Mhatre, Senior Manager at evoting@nsdl.com or contact Mr. Sujit Sengupta, Senior Manager & Compliance Officer, CB Management Services Private Limited, Registrar and Share Transfer Agent(RTA) of the Company at Telephone 033 4011 6728/6700/6739.

Members holding shares in physical mode and who have not yet registered/updated their email IDs, Bank account and other KYC details are requested to update the same by sending duly filled and signed Form ISR-1 or other relevant Forms, as applicable with the RTA or by email at rta@cbmsl.com / ranarc@cbmsl.co. Members holding shares in dematerialized mode are requested to register/update their email IDs, Bank account and other KYC details with the relevant Depository Participants with whom they maintain their Demat Accounts.

***For* Rossell India Limited**
**N K Khurana**
**Director (Finance) and Company Secretary**

**Date : 08.03.2024**
**Place : Kolkata**

# महाशिवरात्रीचे ‘शिवत्व’

**शुद्धी ही उपासनेची पहिली पायरी समजायला हरकत नाही. पंचकर्म आदींद्वारा भौतिक शरीराची शुद्धी करता येते. भटकणाऱ्या मनाला शांत करण्याचे इलाज महत्त्वाचे. यासाठी महाशिवरात्रीच्या दिवशी शिवोपासनेला सुरुवात करावी, अशी कल्पना आहे, ज्यामुळे शिवशक्तीचा उपयोग करून घेता येईल.**



आज आहे महाशिवरात्रीचा पावन उत्सव. यातील ‘शिव’ हा शब्द स्वच्छतेचा, पवित्रतेचा निदर्शक आहे. शिव म्हणजे शुद्धता, शिव म्हणजे संपूर्ण मांगल्य आणि शिव म्हणजे पूर्ण कल्याण. ‘शव’ हे जडाचे निदर्शक आणि ‘इ’ हा शक्तीचा निदर्शक ध्वनी. ‘ऱ्हीं’, ‘क्लीं’ अशा मंत्रामध्ये असलेला ‘इ’ हे शक्तीचे रूप असते. या दोन्हींचे मिलन होते तेव्हा तयार होतो अवतारस्वरूप शिव-शंकर-महादेव म्हणजे तेव्हा जीवन सुरू होते.

शक्तीची अनेक रूपे असतात. शिव-शक्तीचे मिलन ही महाशिवरात्र. शक्तीच्या तीन पातळ्या असतात. शंकर ही संहाराची देवता आग असे मानले जाते, पण शिव ही नाशक शक्ती नसून ती मदतीचा हात देऊन मनुष्याला पुढच्या पातळीवर नेते. भौतिक पातळीवर शरीराचे क्षरण होत असते. आतील जिवाला उत्क्रांतीकडे घेऊन जाण्यासाठी, शरीर सुटल्यावर त्याला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी घेणारी शिव ही देवता. त्यामुळे शिव स्मशानात आधार देण्यासाठी वेशीवर (बॉर्डरवर) उभे असतात, जेथे भौतिकाची पहिली पायरी सुटते व दुसरी पायरी सुरू होते. येथे शिव जिवाला हात देऊन पुढे नेतात.

अस्वच्छतेचा नाश झाला की जे उरते ती स्वच्छता, शुद्धता. भौतिक अशुद्धता सहजपणे काढून टाकता येते. पण मनाची व आत्म्याची अपवित्रता (प्रोग्रॅममध्ये असलेला व्हायरस) काढून टाकणे अवघड असते. शंकरांनी सगळ्यात जहाल विष पचवले, त्या विषाचा परिणाम होऊ दिला नाही, त्यातील चांगला भाग तेवढा घेतला. यामुळे शंकरांना ‘नीलकंठ’ नाव पडले हे आपल्याला माहीत आहे. महादेवांच्या उपासनेमध्ये मनातील, आत्म्यातील अशुद्धी दूर करण्याचे सामर्थ्य आहे.

देव व दानव यांनी अमृतप्राप्तीच्या इच्छेने समुद्रमंथन केले असता सर्वप्रथम हलाहल विष बाहेर आले. या विषाने सर्व सृष्टीचा नाश होण्याची वेळ आली. काय करावे, असा प्रश्न सर्वांसमोर उभा राहिला. श्री शंकरांनी सृष्टीच्या हितासाठी विषाचा स्वतः स्वीकार केला, विष पचवले. ज्या विषामुळे सर्व सृष्टीचा नाश होऊ शकला असता असे समुद्रमंथनातून निघालेले हलाहल भगवान श्री शंकरांनी प्राशन केले व सृष्टीला संहारापासून वाचवले. नंतर समुद्रमंथनातून मिळालेली सर्वच्या सर्व मानवकल्याणाची चौदा रत्ने इतरांना वाटली.

## समुद्रमंथन हा जीवनसंघर्षच

जीवनाचा संघर्ष हे सुद्धा एक समुद्रमंथन होय. सूर्यनाडी, चंद्रनाडी किंवा इडा-पिंगला यांच्यातून होणाऱ्या संदेशाचे व चेतनेचे चलनवलन झाल्यामुळे मेरूदंडरूपी मेरूपर्वत घुसळला जाऊन शरीरातील संपूर्ण रससागर ढवळला जातो. त्यातून जशा सिद्धी प्राप्त होतात तसे काही अंशी धोकेही निर्माण होतात. पण या धोक्यांपासून संरक्षण करण्याची क्षमता शिवोपासनेमध्ये असते.

गव्हाचा एक दाणा पेरल्यानंतर त्यातून तयार होतात अनेक गहू. ‘पेरावेसे वाटणे’ या क्रियेमुळे गहू तयार होत असले तरी त्या दाण्यामध्ये (बीजामध्ये) असलेल्या गुणप्रवृत्तीमुळे, सध्याच्या भाषेत बोलायचे झाले तर त्यात असलेल्या प्रोग्रॅममुळे अनेक गहू तयार होतात, विस्तार होतो. तसे या परमात्मा परमपुरुष बीजाचा विस्तार झाला व विश्व तयार झाले. गव्हाचे पीठ झाले व नंतर पिठाच्या पोळ्या, पराठा, पुऱ्या, फुलका झाला तरी या सर्व गोष्टी गव्हापासून झाल्या असे म्हणता येते. या सर्व गोष्टींचा माय-बाप असतो एक गव्हाचा दाणा.

ही कल्पना लक्षात घेऊन भारतीयांनी प्रत्यक्ष अभ्यासातून व अनुभवातून असे शोधून काढले की, मूळ परमात्मा (बीज) एक आहे व या बीजापासून सर्व विश्वाची उत्पत्ती झालेली आहे. या विश्वाच्या उत्पत्तीतून वेगवेगळ्या गोष्टी तयार झाल्या. माणूसही यातूनच तयार झाला. जसे गव्हाच्या पिठात तेल, तूप, पाणी वगैरे मिसळून वेगवेगळ्या पाककृती बनवता येतात, तसे पंचमहाभूतांच्या माध्यमातून सृष्टीत वेगवेगळी अस्तित्वं तयार होतात. या सर्व योजनेचा उद्देश एकच असतो, तो म्हणजे आनंदप्राप्ती.

## शुद्धी उपासनेची पहिली पायरी

शुद्धी ही या उपासनेची पहिली पायरी समजायला हरकत नाही. पंचकर्म आदींद्वारा भौतिक शरीराची शुद्धी करता येते. भटकणाऱ्या मनाला शांत करण्याचे इलाज महत्त्वाचे. यासाठी महाशिवरात्रीच्या दिवशी शिवोपासनेला सुरुवात करावी, अशी कल्पना आहे, ज्यामुळे या शिवशक्तीचा उपयोग करून घेता येईल.

भगवान श्री शंकरांच्या गळ्याभोवती सर्प असतोच पण त्यांच्या सर्व शरीरावर सर्प फिरत असतात. सर्प हा शरीराने थंड असतो, त्याच्यात सर्व उष्णता व त्यात असलेले विष सापाच्या एक पिशवीत एकवटलेले असते. विषामुळे उष्णता वाढते आणि वाढलेली उष्णता सर्वच इंद्रियावयवांना घातक असते. महाशिवरात्रीच्या दिवशी शरीर व मन शांत ठेवण्याचा संकल्प करून त्या दृष्टीने प्रयत्न करण्यासारखे आहे. यातून थंडाई पिण्याची पद्धत रूढ झाली असावी. अर्धा कप दूध घेतल्यास शरीरातील पित्ताचे शमन होऊन शरीर शांत होऊ लागते यासाठीच श्री शंकरांना दुधाचा अभिषेक प्रिय असावा. शंकर ही कलेची देवता असून त्यांच्या हातात असलेल्या डमरूमुळे त्यांचा ताल व नादाशी असलेला संबंध समजून येतो. संगीताद्वारे शरीराचे तापमान, मनाची चंचलता, राग व उच्छृंखलपणा कमी करता येऊ शकतो, त्या दृष्टीने आरोग्य देणारे संगीत - स्वास्थ्यसंगीत - जीवनसंगीत हे आरोग्यासाठी खूप उपयोगी ठरते.

महाशिवरात्र जवळ आली की आठवण होते थंडाई, भांग यांची. भगवान श्री शंकरांची समाधी व भांगेसारख्या पदार्थांच्या सेवनामुळे येणाऱ्या तंद्रा या दोन गोष्टी अगदीच वेगळ्या असतात. भांग ही एक प्रकारची वनस्पती आहे. भांगेचा एक मोठा दोष म्हणजे ती स्मृतीचा एक लूप म्हणजे चक्र तयार करते त्यामुळे भांग घेतल्यावर मनुष्य त्याच त्याच ठिकाणी विचार करत राहतो. भांग घेतलेला मनुष्य बसला तर बसून राहतो, हसायला लागला तर हसतच राहतो. भांगेच्या या गुणामुळे अनेकांचा असा समज असतो की, भांग घेऊन ध्यानाला बसले तर ध्यान चांगले लागते, पण अशा वेळी साक्षीभाव हरपलेला असल्याने अशा ध्यानाचा काही उपयोग नसतो. भांगेत असलेल्या स्तंभन या गुणाचा उपयोग करून घेण्यासाठी आयुर्वेदाने तिची शुद्धी करण्याचे मार्गदर्शन केलेले आहे. याप्रमाणे शुद्ध केलेली भांग ही मनाची चंचलता दूर करण्यासाठी किंवा स्तंभनासाठी उपयोग करून घेता येतो.

आजच्या महाशिवरात्रीच्या निमित्ताने शरीर, मन शांत ठेवून शरीरातील विषद्रव्ये व मनातील विषारी विचार दूर करून नैतिकता पाळून सत्याच्या मार्गावर चालले तर ‘सत्यं शिवं सुन्दरम्’चा अनुभव नक्कीच घेता येईल.

**(श्रीगुरू डॉ. बालाजी तांबे यांच्या लेखन, व्याख्यानांतून संतुलन आयुर्वेदद्वारा संकलित)**

## विधानसभा अध्यक्षांचा निकाल विरोधाभासी

पान १ वरून

तोपर्यंत या विधानसभेची मुदत संपेल त्यानंतर या याचिकेला काही अर्थच उरणार नाही व ती निष्फळ ठरेल. मुकुल रोहतगी यांच्या युक्तिवाद खोडून काढताना कपिल सिबल म्हणाले, ‘राज्यघटनेतील कलम ३२ अंतर्गत सुनावणी व्हावी, हा याचिकाकर्त्याचा अधिकार आहे.

ठाकरे गटाची याचिका सुनावणीला पात्र असून प्रतिवाद पक्षाने कलम ३२ अंतर्गत यापूर्वीच्या याचिकेत वेळेची मुदत मागितली. त्यावेळी न्यायालयाने याच मुद्यावर ही याचिका दाखल करून घेतली व आमची याचिका याच मुद्यावरून कशी काय सुनावणीला योग्य नाहीक्ष, असा सवाल सिब्बल यांनी केला.

## ‘एआय’ला बळ; महागाई भत्त्यात वाढ

पान १ वरून

उद्देश आहे. डिजिटल इंडिया कॉर्पोरेशन (डीआयसी) अंतर्गत ‘इंडिया एआय’ स्वतंत्र व्यवसाय विभागामार्फत हे अभियान राबविले जाणार आहे. या माध्यमातून ‘एआय’ तंत्रज्ञानाला पूरक अशी संगणक यंत्रणा निर्माण करणे, विविध क्षेत्रांसाठी मूलभूत प्रारुपे तयार करणे, या क्षेत्रासाठी स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करणे, कौशल्यांचा विकास करणे असे उपक्रम आहेत.

**महागाई भत्ता वाढला**

केंद्र सरकारच्या कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वाढीव चार टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेतला. यामुळे महागाई भत्ता ५० टक्क्यांवर गेला आहे.

## जादूटोण्याच्या संशयावरून वृद्धाला निखाऱ्यावर नाचवले

पान १ वरून

त्यातच ४ मार्चला रात्री केरवेळे गावात मंदिरसमोर ग्रामस्थांनी जागरणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या रात्री जागरणाचा गोंधळ सुरू असताना त्याच गावातील १५ ते २० जणांनी लक्ष्मण भावार्थे यांना अंथरुणावरून उचलून गोंधळाच्या ठिकाणी जळत्या निखाऱ्यांवर उभे केले. ‘चल तुझा देव अंगात आणून दाखव, तू भुताटकी करतोस कबूल कर,’ असे म्हणून जबरदस्ती त्यांना पकडून जळत्या निखाऱ्यांवर उभे केले. त्यांना मारहाणही करण्यात आले. हा सर्व प्रकाराचा व्हिडीओ काढून गावातील एका जागरूक नागरिकाने तो अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे पाठवला. या व्हायरल व्हिडीओमुळेच हा अघोरी प्रकार उघड झाला. पेटत्या निखाऱ्यांवर नाचवल्याने लक्ष्मण हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या पायाला फोड आले असून पाठीवरची कातडीही जळाली आहे. या प्रकरणातील आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गरीब कुटुंबातील वृद्धास भुताळ्या समजून त्याची जळत्या निखाऱ्यावर अग्निपरीक्षा घेणे ही अत्यंत अमानवी घटना आहे. अशी घटना पुरोगामी महाराष्ट्रात आज घडते ही लाजिरवाणी बाब आहे. लक्ष्मण भावार्थे यांना भुताळ्या ठरवणाऱ्या आसनगावचा देवा म्हसकर (भगत) या मांत्रिकावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी, अशी मागणी अंनिसने केली आहे.

## गर्भवती महिलांना ‘वर्क फ्रॉम होम’

पान १ वरून

नावापुढे वडिलांचे नाव लावले जात होते. काहीजण स्वेच्छेने आईचेही नाव लावत होते. मात्र चौथ्या महिला धोरणामधील तरतुदीनुसार यापुढे अधिकृत कागदपत्रांवरही आईचे नाव लावण्याची पद्धत सुरू होणार आहे. यात सर्व महिलांना हॉटेलसाठी स्थानिक करात १० टक्के, व्यावसायिक करातून १० टक्के सूट आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात १० टक्के आरक्षण अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत. महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांसाठी भूखंड तसेच आरक्षित प्रवर्गातील महिलांसाठी प्राधान्य अशा प्रकारच्या सवलती देण्यात येतील. कामगाराच्या निवृत्ती वेतनाचे पैसे त्याच्या मृत्यूनंतर आई-वडील आणि पत्नी यांच्यात समान वाटप करण्यात येतील. क्रीडा, कला, व्यावसायिक आणि विज्ञान शिक्षणात महिला, मुलींसाठी ३० टक्के आरक्षण दिले.

## टाटा पॉवरच्या ग्राहकांना वीज दरवाढीचा शॉक

पान १ वरून

वसुली करण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे सर्वच वीज ग्राहकांच्या वीज दरात मोठी वाढ होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

**वीज वहन आकारात मोठी वाढ**

सध्या टाटा पॉवरचा प्रति युनिटचा वीज वहन आकार (व्हीलिंग चार्जेस) १.६९ रुपये आहे. त्यामध्ये सुमारे दुपटीहून अधिकची वाढ करण्यात आली असून तो आता ३.१५ रुपये होणार आहे. त्यामुळे ग्राहकांच्या खिशाला मोठी चाट लागणार आहे.

**स्थिर आकारात वाढ**

वीज आयोगाने टाटा पॉवरच्या स्थिर आकारातील वाढही मंजूर केली आहे. आतापर्यंत घरगुती ग्राहकांना ८५ रुपये स्थिर आकार लागत होता, तो ९० रुपये होईल. तर ज्यांना १२५ रुपये लागत होता तो १३५ रुपयांपर्यंत वाढवला आहे.

**मध्य रेल्वे**

**फियाट बोगीचे स्ट्रिपिंग, क्लीनिंग आणि पेंटिंग**

**कामाचे नाव :** परेल वर्कशॉप, मुंबई येथे फियाट (FIAT) बोगीचे स्ट्रिपिंग, क्लीनिंग व पेंटिंग अर्थात स्ट्रिपिंगसह स्वच्छता व रंगकाम आदी कामे करणे (प्रमाण 252 बोगी). अंदाजे किंमत: ₹ 6,56,608.68. **निविदा अर्जाची किंमत :** शून्य. **बयाणा रक्कम (EMD) :** ₹ 13,100/-. **पूर्णता कालावधी :** 3 महिने. **ई-निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ 28/03/2024 रोजी 11.00 वाजेपर्यंत असेल.** ई-निविदेचा संपूर्ण तपशील रेल्वेच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे: **https://www.ireps.gov.in**

**खुली ई-निविदा सूचना क्र.: PR-LHB-BC-23-24-603A दि. 06/03/2024**

तिकीटासाठी UTS App डाउनलोड करा 956

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-400 008.

**जाहिरात**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालयात व टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय मधील मूत्रपिंडोपचारशास्त्र विभागासाठी 03 हिमोडायलिसिस टेक्निशियन पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्याबाबतचा विस्तृत जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिककेच्या http://portal.mcgm.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

इच्छुक उमेदवारांनी उपरोक्त संकेतस्थळावर भेट देऊन, सदर पदाकरिता पात्र असल्यास आपला अर्ज आवश्यक कागदपत्रांसह बा. य. ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. ए. एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई- 400 008 यांच्या आवक-जावक कार्यालयात दि. 07.03.2024 पासून दि. 15.03.2024 पर्यंत सर्व शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्ट्या वगळून सादर करावेत.

दि. 04/03/2024

सही/-
**अधिष्ठाता**
**बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय**

कुठेही पाणी साचू देऊ नका, डासांना निमंत्रण देऊ नका.

PRO/3286/ADV/2023-24

**APPOINTMENT ♦ JOB ♦ INTERVIEW**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**
Post Box No. 80, Umavi Nagar, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

**Advertisement No. 02/2024**

Online applications are invited from the eligible candidates for the post of Dean, Faculty of Science and Technology and Director, Knowledge Resource Centre **sanctioned by Govt. of Maharashtra.**

Details such as qualifications, subject, reservation, Salary, procedure for submitting online application etc. are available on the University website www.nmu.ac.in. **Last date for online application** (https://apps.nmu.ac.in/recruitment) **is 08/04/2024 and submission of hard copy is 18/04/2024.**

Place : Jalgaon
Date : 07/03/2024
**REGISTRAR**

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
जी. टी. हॉस्पिटल कंपाऊंड, बी. टी. मार्ग, जे. जे. स्कुल ऑफ आर्ट्सच्या पाठीमागे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या जवळ, मुंबई – ४००००१.
दूरध्वनी: (०२२)२२६५७६६२, फॅक्स: २२६५८०१७, • Email apamvmmm2021@gmail.com

**निविदेसाठी सूचना**
**आऊटसोर्स तत्त्वावर कर्मचारी पुरविण्यासाठी पात्र सेवा प्रदात्याची नेमणूक करण्याची प्रक्रिया.**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) आउटसोर्स तत्त्वावर कर्मचारी पुरविण्यासाठी पात्र सेवा प्रदात्याची नेमणूक करण्याकरिता स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी नामांकित आणि अनुभवी कंपन्यांकडून प्रस्ताव मागवित आहे.

तपशीलवार निविदा दस्तऐवजासाठी, इच्छुक बोलीदारांनी https://organizations.maharashtra.nextprocure.in किंवा https://udyog.mahaswayam.gov.in ला भेट द्यावी.

निविदा ऑनलाइन सादर करायची आणि प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ०१/०४/२०२४ आहे. (१८:०० वाजेपर्यंत)

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक

**Maharashtra University Of Health Sciences, Nashik**
MUHS
Dindori Road, Mhasrul, Nashik- 422004
Phone No. 0253-2539149 EPBX : 0253-2539100, 300
Email : registrar@muhs.ac.in/purchase@muhs.ac.in, Website : http://www.muhs.ac.in

**E-tender Notice No. MUHS/PUR/04/2024**

Maharashtra University of Health Sciences, Nashik Invite proposed for supply of Manikins, Equipment, Software, ect. for the simulation lab under the proposed Centre of Excellence (COE) at MUHS, Nashik

For the detailed Tender document, interested bidder should visit **http://mahatenders.gov.in** and **www.muhs.ac.in**

Tender Submission would be onling and the deadline to submit the proposals is 26/03/2024

Date : 08/03/2024

Registrar
MUHS, Nashik

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
जी. टी. हॉस्पिटल कंपाऊंड, बी. टी. मार्ग, जे. जे. स्कुल ऑफ आर्ट्सच्या पाठीमागे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या जवळ, मुंबई – ४००००१.
दूरध्वनी: (०२२)२२६५७६६२, फॅक्स: २२६५८०१७, • Email apamvmmm2021@gmail.com

**निविदेसाठी सूचना**
**व्याज प्रतिपूर्ती योजनांचे वेबवर आधारित लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) सध्या सुरू असलेल्या व्याज प्रतिपूर्ती योजनांशी संबंधित दस्तऐवजांचे वेबवर आधारित लेखापरीक्षण करण्यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता नामांकित आणि अनुभवी कंपन्यांकडून प्रस्ताव मागवित आहे.

तपशीलवार निविदा दस्तऐवजासाठी, इच्छुक बोलीदारांनी https://organizations.maharashtra.nextprocure.in किंवा https://udyog.mahaswayam.gov.in ला भेट द्यावी.

निविदा ऑनलाइन सादर करायची आणि प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ०१/०४/२०२४ आहे. (१८:०० वाजेपर्यंत)

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक

**मूर्तिजापूर नगरपरिषद, मूर्तिजापूर**
ता. मूर्तिजापूर, जिल्हा. अकोला

**इ-निविदा सूचना क्र.... सन २०२४**

**चिंदी तलाव पुनर्जीवन प्रकल्प, ता. मूर्तिजापूर, जिल्हा. अकोला** या कामाची निविदा नगरपरिषद मूर्तिजापूर कडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजीत किंमत रु.२.९६ कोटी असून या कामासंबधीचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : ०८/०३ /२०२४-२५

सही/-
मुख्य अधिकरी
मूर्तिजापूर नगरपरिषद, मूर्तिजापूर

**sanofi**

**सनोफी इंडिया लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** सनोफीहाऊस, सीटीएस. क्रमांक ११७-बी, एल अँड टी बिझनेसपार्क, साकी विहार रोड, पवई, मुंबई ४०००७२.
**दूरध्वनीक्रमांक:** (९१-२२) २८०३२००० **फॅक्सक्रमांक:** (९१-२२) २८०३२९३९
**कॉर्पोरेट ओळख क्रमांक:** एल२४२३९एमएच१९५६पीएलसी००९७९४
**वेबसाईट:** www.sanofiindialtd.com • **ई-मेल:** IGRC.SIL@sanofi.com

**भागधारकांसाठी सूचना**

**गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) खात्यात समभागांचे हस्तांतरण**

कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (हिशेब, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६ (नियम) मधील तरतुदी व त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने ही सूचना प्रकाशित करण्यात येत आहे.

या नियमांमध्ये, इतर बाबींबरोबरच, भागधारकांनी सलग सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी ज्या भागांच्या बाबतीतील लाभांशाचा दावा करण्यात आलेला नाही किंवा तो प्रदान करण्यात आलेला नाही, ते गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याची तरतूद आहे.

कार्यालयातील नोंदींवरून असे लक्षात आलेले आहे की, कंपनीच्या विशिष्ट भागधारकांनी २०१६ या वर्षासाठीच्या ‘अंतिम लाभांशातील’ त्यांच्या लाभांशाचे रोखीकरण आणि त्याचा दावा सलग सात वर्षे केलेला नाहीए, जो आता हस्तांतरण करण्यात योग्य झालेला आहे.

या निमांमध्ये दिलेल्या विविध आवश्यकतांच्या अधीन राहून, ज्या भागधारकांना समभाग गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (''आयईपीएफ'') खात्यामध्ये हस्तांतरण करण्यास पात्र आहेत, त्यांना या नियमांतर्गत योग्य ती कृती करण्यासंबंधी कंपनीने व्यक्तिश: कळविलेले आहे.

आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यास पात्र असलेल्या अशा भागधारकांने आणि भागांचे संपूर्ण तपशील कंपनीने तिच्या www.sanofiindialtd.com या संकतस्थळावरही अपलोड केलेले आहेत.

जर ११ जून २०२४ पर्यंत समभागांच्या बाबतीत कोणताही वैध दावा प्राप्त झाला नाही, तर नियमांमध्ये विहित केलेल्या आवश्यकतांचे पालन करण्याच्या दृष्टीने कंपनी, नियमांमध्ये विहित केलेल्या कार्यप्रणालीनुसार देय तारखेस हे भाग आयईपीएफकडे हस्तांतरित करील. कृपया नोंद घ्या की, आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या प्रदान न केलेल्या लाभांशाच्या रकमेचा आणि समभागांचा दावा कंपनीकडे करता येणार नाही.

भागधारकांनी नोंद घ्यावी की, आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यात आलेला दावा न केलेला लाभांश आणि भाग, त्यांवर भविष्यात मिळणारा लाभ काही असलाच तर त्यासहितच्या रकमेचा दावा, नियमांमध्ये दिलेल्या योग्य त्या कार्यप्रणालीचे पालन करून, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा करता येऊ शकतो.

भागधारकांना याविषयी जर काही शंका असेल, तर ते कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण अभिकर्ता आणि/किंवा कंपनी यांच्याशी खालील पत्त्यावर संपर्क साधू शकतात.

**लिंक इनटाईम इंडिया प्रा. लि.,**
सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई ४०० ०८३
दूरध्वनी क्र. (०२२) ४९१८६२७०
ई-मेल: rnt.helpdesk@linkintime.co.in

**सनोफी इंडिया लिमिटेड,**
सनोफी हाऊस, सीटीएस क्र. ११७-बी, एल अँड टी बिझिनेस पार्क, साकी विहार रोड, पवई, मुंबई ४०० ०७२.
दूरध्वनी क्र.: (९१-२२) २८०३ २०००
ई-मेल: igrc.sil@sanofi.com

**सनोफी इंडिया लिमिटेडकरिता**

ठिकाण: मुंबई
दिनांक: ८ मार्च २०२४

**राधिका शाह**
**विधी विभागप्रमुख आणि कंपनी सचिव,**
**सभासदत्व क्र. ए१९३०८**

**भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, नागपूर**

ई-मेल:- mineralblockauction@mahadgm.gov.in

दिनांक - ०७/०३/२०२४

**निविदा मागणी सूचना**

**“चुनखडक, लोहखनिज व बॉक्साईट या खनिजांचे खनिपट्टा, बॉक्साईट या खनिजांचे संयुक्त परवाना आणि लिड, झिंक व कॉपर (बेस मेटल) व डायमंड या खनिजांचे पुर्वेक्षण अनुज्ञप्ती मंजूरीस्तव मागणीपत्रक”**

खाण व खनिजे (विकसन व नियमन) अधिनियम, १९५७ च्या कलम १० (ब), १० (ब) (अ) व ११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि खनिज लिलाव नियम-२०१५ अंतर्गत अधिसूचित केलेनुसार महाराष्ट्र शासनाने खनिज क्षेत्र जसे चुनखडक, लोहखनिज व बॉक्साईट या खनिजांचे खनिपट्टा, बॉक्साईट या खनिजांचे संयुक्त परवाना आणि लिड, झिंक व कॉपर (बेस मेटल) व डायमंड या खनिजांचे पुर्वेक्षण अनुज्ञप्ती यांची लिलावाकरिता निवड केलेली असून याद्वारे खनिपट्टा, संयुक्त परवाना व पुर्वेक्षण अनुज्ञप्ती मंजूरीचे हेतूने

निविदा मागविण्यात येत आहे :-

अ) ४ (चार) खनिज क्षेत्रे [२ (दोन) क्षेत्रे चुनखडक, १ (एक) क्षेत्र लोहखनिज व १ (एक) क्षेत्र बॉक्साईट करिता] इलेक्ट्रानिक लिलावासाठी खनिपट्टा मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे.

ब) ४ (चार) खनिज क्षेत्रे [४ (चार) क्षेत्रे बॉक्साईट करिता] इलेक्ट्रानिक लिलावासाठी संयुक्त परवाना मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे.

क) २ (दोन) खनिज क्षेत्रे [१ (एक) क्षेत्र लिड, झिंक व कॉपर (बेस मेटल) व १ (एक) क्षेत्र डायमंड करिता] इलेक्ट्रानिक लिलावासाठी पुर्वेक्षण अनुज्ञप्ती मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे.

**खनिज क्षेत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे :-**

| अ.क्र | खनिज क्षेत्राचे नांव | खनिज | सवलतीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | खटवेश्वर-२ बॉक्साईट क्षेत्र | बॉक्साईट | संयुक्त परवाना |
| २. | साडेवाडी-२ बॉक्साईट क्षेत्र | बॉक्साईट | संयुक्त परवाना |
| ३. | डिंगनवाडी बॉक्साईट क्षेत्र | बॉक्साईट | संयुक्त परवाना |
| ४. | सांडवे-२ बॉक्साईट क्षेत्र | बॉक्साईट | संयुक्त परवाना |
| ५. | बोरगांव-खांडला चुनखडक क्षेत्र | चुनखडक | खनिपट्टा |
| ६. | धुनकी-लखमापूर चुनखडक क्षेत्र | चुनखडक | खनिपट्टा |
| ७. | अडवली (कुडोपी) बॉक्साईट क्षेत्र | बॉक्साईट | खनिपट्टा |
| ८. | कळणे लोहखनिज क्षेत्र | लोहखनिज | खनिपट्टा |
| ९. | जिंजगांव क्षेत्र | लिड, झिंक व कॉपर (बेस मेटल) | पुर्वेक्षण अनुज्ञप्ती |
| १०. | कुरखेडा क्षेत्र | डायमंड | पुर्वेक्षण अनुज्ञप्ती |

निविदा दस्ताऐवजाची किंमत प्रत्येक खनिज क्षेत्राकरिता रु.५,००,०००/- (रुपये पाच लक्ष फक्त) जीएसटी वगळून राहील. The GST shall be payable by reverse charge mechanism.

त्यानुसार वित्तीय निविदा फक्त आकडे स्वरुपात आणि तांत्रिक निविदा ही दोन्ही (हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी) स्वरुपात पात्र बोलीधारकाकडून मागविण्यात येत आहे.

ई-लिलावामध्ये भाग घेणेकरिता पात्रता अटी, दिनांक आणि वेळ, निविदा पत्रिकेमध्ये अंतर्भूत केलेली आहे.

सविस्तर निविदा पत्रिके सोबत मुदत अवधी (कालावधी), अधिसूचना, अद्यावत सुधारणा आणि इतर सविस्तर माहिती ही खनिज क्षेत्राच्या ई-लिलाव प्रक्रियेकरिता फक्त इलेक्ट्रानिक स्वरुपात उपलब्ध आहे आणि MSTC Limited (http://mstcecommerce.com/auctionhome/mlcl/index.jsp) या संकेतस्थळावरुन डाऊन लोड करता येईल.

इच्छुक व पात्र बोलीधारक उपरोक्त संकेतस्थळावर नोंदणी करु शकतात. यशस्वी नोंदणी प्रक्रीयेनंतर पात्र बोलीधारकांना लॉगीन नोंदणी क्रमांक व पासवर्ड प्राप्त करता येईल. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणेस्तव पासवर्ड आवश्यक राहील. नमुना निविदा दस्ताऐवज व खनिज क्षेत्राबाबत संक्षिप्त माहिती ही वरील संकेतस्थळावर मोफत उपलब्ध आहे.

लिलावाबाबत मुख्य कार्यक्रम आणि त्यांचा कालावधी खालीलप्रमाणे :-

| कार्यक्रमाचे वर्णन | दिनांक |
|---|---|
| निविदा मागणी सुचना प्रसिध्दीचा दिनांक (NIT) | गुरुवार, ०७ मार्च, २०२४ |
| निविदा पत्रिका प्राप्त करण्याचा दिनांक | मंगळवार, १२ मार्च, २०२४ |
| निविदापूर्व बैठक | शुक्रवार, ५ एप्रिल, २०२४ |
| निविदा फी रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) चा भरणा केल्यानंतर विशिष्ट खनिज क्षेत्राकरिता निविदा पत्रिका खरेदी करण्याची अंतिम तारीख | शुक्रवार, २६ एप्रिल, २०२४ |
| तांत्रिक निविदा (Technical bid) आणि Initial Price offer सादर करण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार, ३ मे, २०२४ |

**Note:**

Bidders may note that for composite licences the Mineral (Auction) Amendment Rules, 2022 have dispensed with the requirement of indicating the division of the land into forest land, land owned by the State Government, and land not owned by the State Government and has provided the flexibility of demarcating the concession area using global positioning system in addition to using total station and differential global positioning system.

However, the requisite demarcation in respect of certain blocks, as and where available, shall be provided as part of the information memorandum.

डीजीआयपीआर/२०२३-२४/९३९६